महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/नियोजन/मालमत्ता माहिती / २०२३/१३६७ दिनांक : 27 MAR 2023

**अतितात्काळ / कालमर्यादीत**

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, संस्था.

**विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत सर्व शासकीय तंत्रनिकेतनामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करणे व संस्थेतील इमारती सुस्थितीत ठेवणेबाबत.**

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. ९ नियोजन/मालमत्ता माहिती /२०२२-२३/८५ दि. ०३.०३.२०२३.
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. ९ तंशिसं/नियोजन/२०२१/१४४, दि. १८.०३.२०२१.
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. ९ नियोजन/मालमत्ता माहिती /२०२३/११७ दि. २३.०३.२०२३.

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्राचे अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व शासकीय संस्थांमध्ये उपलब्ध सोयी सुविधांची विहीत नमुन्यातील माहिती, तसेच संस्थेतील बांधकामांचे सर्वेक्षण करण्याकरीता ३ सदस्यांची सर्वेक्षण समिती गठीत करण्यात आलेली होती. त्यांच्यामार्फत अस्तित्वात असलेल्या इमारतींची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्याकरीता अंदाजित किती खर्च अपेक्षित आहे, याबाबतची माहिती प्राप्त झालेली आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी, शासकीय तंत्रनिकेतनातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता पोषक वातावरण निर्मिती करण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या परिसराचे सुशोभिकरण करुन बांधकाम सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. त्याकरीता प्राधान्याने अनुषंगिक बांधकामांचे अंदाजपत्रक संबंधित सा.बा. विभागाकडून प्राप्त करुन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावे, असे निर्देश मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने, प्राधान्याने खालीलप्रमाणे बांधकामाची पाहणी करुन संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे अंदाजपत्रक मुख्य अभियंता यांचे तांत्रिक सहमतीसह खालीलप्रमाणे या विभागीय कार्यालयास ०३ प्रतीत सादर करण्यात यावे.

**अ. प्रशासकीय व शैक्षणिक इमारती.**

१. इमारतींचे गळती प्रतिबंधक उपाय योजना करणे,
२. रंगरंगोटी करणे,
३. खिडक्या/दरवाजे सुस्थितीत करणे,
४. इमारतीमधील प्रसानगृहे/स्वच्छतागृहे सुस्थितीत करणे,
५. पाणी पुरवठा नियमित उपलब्ध होण्याकरिता उपाययोजना करणे.
६. संस्थेचे प्रवेश-द्वार सुस्थितीत करुन प्रवेशद्वाराजवळ बगीचा तयार करुन निगा राखण्याची व्यवस्था करणे.

कृ.मा.प.

**ब. वसतिगृह इमारती.**

१. इमारतींचे गळती प्रतिबंधक उपाय योजना करणे,
२. रंगरंगोटी करणे,
३. खिडक्या/दरवाजे सुस्थितीत करणे,
४. इमारतीमधील प्रसानगृहे/स्वच्छतागृहे सुस्थितीत करणे,
५. पाणी पुरवठा नियमित उपलब्ध होण्याकरिता उपाययोजना करणे.
६. आवश्यकतेनुसार वसतीगृहाच्या प्रवेशद्वार सुस्थितीत करुन प्रवेशद्वाराजवळ बगीचा तयार करुन निगा राखण्याची व्यवस्था करणे.

वरील मुद्दा क्र. "अ" व "ब" नुसार प्रशासकीय व शैक्षणिक बाबींचे एक अंदाजपत्रक व वसतिगृहासंबंधित बाबींचे एक अंदाजपत्रक याप्रमाणे **प्रति संस्था दोनच अंदाजपत्रक दिनांक १०.०४.२०२३ रोजीपर्यंत या विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयाची प्रशासकीय मान्यता घेणेकरीता सादर करण्यात यावे.** तसेच, मुद्दा क्र. "अ" व "ब" मधील प्रस्तावीत बांधकामे पूर्ण झाल्यानंतर त्याचे नियमीत देखभाल दुरुस्ती करण्यासाठी संस्था स्तरावरील प्रयोजन व त्यासाठी लागणारा आवश्यक वार्षिक निधी याबाबत सविस्तर अहवाल प्रस्तावासह सादर करण्यात यावा. बांधकामाचे प्रस्ताव तयार करतांना संचालनालयाद्वारे संदर्भीय क्र. २ च्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

सोबत - संदर्भीय पत्र.

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४९०, ६८५९७४०९,
ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ९/नियोजन/मालमत्ता माहिती/२०२३/११८ दिनांक : 23 MAR 2023

**अतितात्काळ / कालमर्यादीत**

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद
अमरावती व नागपूर.

विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत शासकीय तंत्रनिकेतनामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करणे व संस्थेतील इमारती सुस्थितीत ठेवणेबाबत.

संदर्भ :- १. संचालनलायाचे पत्र क्रमांक : ९/नियोजन/मालमत्ता माहिती/२०२३/८५, दिनांक ०३.०३.२०२३.
२. संचालनलायाचे पत्र क्रमांक : ९/तंशिसं/नियोजन/२०२१/१४४, दिनांक १८.०३.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन संचालनलायाच्या संदर्भिय पत्रान्वये तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व शासकीय संस्थांमध्ये उपलब्ध सोयी सुविधांची विहित नमुन्यातील माहिती, तसेच संस्थेतील बांधकामांचे सर्वेक्षण करण्याकरीता ३ सदस्यांची सर्वेक्षण समिती गठीत करुन त्यांच्यामार्फत अस्तित्वात असलेल्या इमारतींची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्याकरीता अंदाजित किती खर्च अपेक्षित आहे, याबाबतची अहवालासह माहिती दिनांक २०.०३.२०२३ पर्यंत सादर करण्याबाबत कळविले होते. तरी, सदरहू माहिती अद्याप अप्राप्त असून माहिती, विहित नमुन्यात तात्काळ सादर करण्यांत यावी.

प्रस्तुत प्रकरणी, शासकीय तंत्रनिकेतनातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता पोषक वातावरण निर्मिती करण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या परिसराचे सुशोभिकरण करुन बांधकाम सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. त्याकरीता प्राधान्याने अनुषंगिक बांधकामांचे अंदाजपत्रक संबंधित सा.बा. विभागाकडून प्राप्त करुन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावे, असे निर्देश मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी दिलेले आहेत.

त्यानुषंगाने, प्राधान्याने खालीलप्रमाणे बाधकामांची पाहणी करुन संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे अंदाजपत्रक मुख्य अभियंता यांचे तांत्रिक सहमतीसह संचालनालयास सादर करण्यात यावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 27 MAR 2023 आवक क्र. 2826

अ. **प्रशासकीय व शैक्षणिक इमारती**

१. इमारतींचे गळती प्रतिबंधक उपाय योजना करणे,
२. रंगरंगोटी करणे,
३. खिडक्या/दरवाजे सुस्थितीत करणे,
४. इमारतीमधील प्रसाधनगृहे/स्वच्छतागृहे सुस्थितीत करणे,
५. पाणी पुरवठा नियमित उपलब्ध होण्याकरिता उपाययोजना करणे.
६. संस्थेचे प्रवेश- व्दार सुस्थितीत करुन प्रवेशव्दाराजवळ बगीचा तयार करुन निगा राखण्याची व्यवस्था करणे.

ब. **वसतिगृह इमारती**

१. इमारतींचे गळती प्रतिबंधक उपाय योजना करणे,
२. रंगरंगोटी करणे,
३. खिडक्या/दरवाजे सुस्थितीत करणे,
४. इमारतीमधील प्रसाधनगृहे/स्वच्छतागृहे सुस्थितीत करणे,
५. पाणी पुरवठा नियमित उपलब्ध होण्याकरिता उपाययोजना करणे.
६. आवश्यकतेनुसार वसतिगृहाच्या प्रवेशव्दार सुस्थितीत करुन प्रवेश व्दाराजवळ बगीचा तयार करुन निगा राखण्याची व्यवस्था करणे.

वरील मुद्या क्र. "अ" व "ब" नुसार प्रशासकीय व शैक्षणिक बाबींचे एक अंदाजपत्रक व वसतिगृहासंबंधित बाबींचे एक अंदाजपत्रक याप्रमाणे **प्रती संस्था दोनच अंदाजपत्रक दिनांक १५.०४.२०२३ पर्यंत संचालनालयास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावे**. तसेच, मुद्या क्र. "अ" व "ब" मधील प्रस्तावित बांधकामे पूर्ण झाल्यानंतर त्याचे नियमित देखभाल दुरुस्ती करण्यासाठी संस्था स्तरावरील प्रयोजन व त्यासाठी लागणारा आवश्यक वार्षिक निधी याबाबत सविस्तर अहवाल प्रस्तावासह सादर करण्यांत यावा. बांधकामाचे प्रस्ताव तयार करतांना संचालनालयाद्वारे संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यांत यावे.

**( डॉ. विनोद म. मोहितकर )**
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.